# प्रकरण पहिले

## ग्रामीण साहित्य स्वरुप व वाटचाल

## प्रकरण पहिले

# ग्रामीण साहित्य स्वरुप व वाटचाल

प्रस्तावना

साहित्य म्हणजे काय?

साहित्य आणि जीवन

वाङ्.मयीन चळवळी–दलित आणि ग्रामीण

ग्रामीण म्हणजे काय?

ग्राम संस्कृतीचे स्वरुप

ग्रामीण आणि नागर यातील भेद

ग्रामीण साहित्य म्हणजे काय?

ग्रामीण साहित्य निर्मिती व प्रेरणा

ग्रामीण साहित्याची चळवळ

ग्रामीण कथा, कविता, कादंबरीची वाटचाल

ग्रामीण साहित्यावरील आरोप आणि मर्यादा

ग्रामीण साहित्याचे भवितव्य

सारांश

संदर्भसूची

# प्रकरण पहिले

# ग्रामीण साहित्य स्वरूप व वाटचाल

**प्रस्तावना :**

स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात समाजामध्ये राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक क्षेत्रात अनेक चळवळी झाल्या. ग्रामीण जीवनाचा विकास व्हावा हा मुख्य उद्देश असलेल्या या चळवळी काही प्रमाणात यशस्वी ठरल्या तर काही प्रमाणात अयशस्वी ठरल्या. या चळवळींमधून साहित्यामध्येही ग्रामीण, दलित, स्त्रिवादी, आदिवासी, जनवादी इत्यादी वाड्.मयीन प्रवाह निर्माण झाले. या सर्व प्रवाहांमध्ये महत्त्वाचा वाड्.मयीन प्रवाह म्हणजे ग्रामीण साहित्याचा प्रवाह होय. महात्मा जोतिबा फुले यांची मुख्य प्रेरणा असलेल्या साहित्य प्रवाहात प्रामुख्याने ग्रामीण लोकांच्या सुख–दु:खांचा, व्यथा–वेदनांचा, श्रद्धा–अंधश्रद्धांचा, रुढी–परंपरांचा, कृषिनिष्ठ समाजव्यवस्थेचा चर्चेचा विषय येतो. महात्मा गांधी, जवाहरलाल नेहरू, शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील, इंदिरा गांधी यांच्या समजक्रांतीकारी विचाराने समाजामध्ये अनेक स्थित्यंतरे झाली व या सर्व गोष्टींचा प्रभाव साहजिकपणे ग्रामीण साहित्यावर पडला.

घटनेने दिलेल्या लेखन व भाषण स्वातंत्र्याचा वापर करत ग्रामीण सुशिक्षित तरूण आपल्या व्यथा, वेदना, सुखदु:खे साहित्यात मांडू लागला. त्यामध्ये व्यंकटेश माडगूळकर, श्री.म.माटे, आनंद यादव, शंकर पाटील, ग.ल.ठोकळ, रा. रं. बोराडे, सदानंद देशमुख इत्यादी अनेक प्रतिभा संपन्न माणसांची नावे घेता येतील. या सर्व प्रतिभासंपन्न लोकांनी आपल्या ग्रामीण बोलीत आपलं रोजचं जगणं, बोलणं, वागणं मांडायला सुरवात केली. यासाठी त्यांनी कथा, कादंबरी, कविता, नाटक, वैचारिक लेखन इत्यादी वाड्.मयीन प्रकार हाताळले. या सर्व वाड्.मयीन प्रकारामधून त्यांनी ग्रामीण जीवन, जाणीवा कशा पद्धतीने जिवंत केल्या आणि ग्रामीण साहित्य चळवळीच्या साहित्याचे स्वरूप कशा प्रकारचे आहे.

त्याची वाटचाल कशापद्धतीने चाललेली आहे. याचा उहापोह सदर प्रकरणात प्रस्तुत प्रबंधलेखक करणार आहे.

## साहित्य म्हणजे काय? :

'ग्रामीण साहित्य स्वरूप व वाटचाल' या प्रकरणाचे विवेचन करण्यापूर्वी साहित्य म्हणजे काय? साहित्याच्या व्याख्या, साहित्याची संकल्पना, साहित्याबद्दल पौर्वात्य व पाश्चात्य साहित्य शास्त्रज्ञांची विविध मतमतांतरे, साहित्याचा आणि जीवनाचा पर्यायाने समाज जीवनाचा संबंध त्या जीवनानुभवातून साकारलेल्या वाड्.मयीन चळवळी व त्या चळवळीतून अलिकडच्या काळात निर्माण झालेले साहित्यातील दलित व ग्रामीण हे महत्त्वाचे दोन प्रवाह यांची थोडक्यात चर्चा करणे क्रमप्राप्त ठरते.

'साहित्य' हा शब्द वाड्.मय या अर्थानेच मराठीत वापरला जातो. साहित्य आणि वाड्.मय हे शब्द संस्कृतमधून मराठीत आले आहेत. साहित्य या शब्दातून ललित साहित्य किंवा ललित वाड्.मय असाच अर्थ अभिप्रेत आहे. संस्कृत भाषेमध्ये साहित्यासाठी काव्य असा शब्द वापरला असून तो अत्यंत व्यापक अशा अर्थाने वापरला आहे. काव्याच्या पद्यमय भागासच तो वापरला जातो असे नसून साऱ्याच साहित्याचा अंतर्भाव 'काव्य' या शब्दात होई. मानवी भावसृष्टीचे रमणीय दर्शन घडविणारे सौंदर्यप्रधान साहित्य काव्य या शब्दाने अभिप्रेत आहे. म्हणूनच दंडीपासून जगन्नाथापर्यंतच्या पूर्वकालीन साहित्यशास्त्रज्ञांनी केलेली काव्य लक्षणे हीच साहित्याची लक्षणे ठरतात.

'वाणीच्या माध्यमातून जे जे व्यक्त होते ते वाड्.मय' ही व्याख्या मौखिक वाड्.मयासाठी ठीक असली तरी आज वाड्.मय लिखित स्वरूपात निर्माण होत असल्याने वाड्.मयाला व्यापक अर्थ प्राप्त झाला आहे. विश्वातील सर्वच वाग्व्यवहार शब्द आणि अर्थ यांच्याच माध्यमातून सिद्ध होत असतात. म्हणूनच भामह, दण्डी, वामन, मम्मट, जगन्नाथ पंडित यांसारख्या साहित्यशास्त्रज्ञांनी आपल्या काव्यलक्षणात शब्दार्थांना आशयापेक्षा

अधिक महत्त्व दिल्याचे दिसून येते. संस्कृत साहित्यकारांनी काव्याचे शरीर व आत्मा असे विभाग कल्पून त्याप्रमाणे काही व्याख्या केल्या आहेत त्या पुढीलप्रमाणे –

१) शब्दार्थो सहितौ काव्यम् – भामह

(शब्द आणि अर्थ यांचे सहितत्त्व म्हणजे काव्य)

२) रमणीयार्थ प्रतिपादक : शब्द : काव्यमं – जगन्नाथ

(रमणीय अर्थाचे प्रतिपादन करणारे शब्द म्हणजेच काव्य होय)

३) काव्यं ग्राह्य अलंकारात। सौंदर्य अलंकार । –वामन

(काव्य हे अलंकारामुळेच ग्राह्य होते, सौंदर्य हाच अलंकर होय)

४) वाक्यं रसात्मकं काव्यम् – विश्वनाथ

(रसयुक्त वाक्य म्हणजे काव्य होय)

५) काव्यस्य आत्मा ध्वनी : – आनंदवर्धन

(ध्वनी हा काव्याचा आत्मा होय) [१]

अशाप्रकारे संस्कृत साहित्य मीमांसकांनी काव्याच्या, साहित्याच्या केलेल्या व्याख्यांवरून असे म्हणता येते की, साहित्य हा शब्द संस्कृत वाङ्.मयात ललित वाङ्.मय या अर्थानेच उपयोगात आणलेला आहे.

पौर्वात्य साहित्यशास्त्रज्ञांप्रमाणे काव्यासंबंधी शरीर व आत्मा या परिभाषा न वापरता पाश्चात्य साहित्यशास्त्रज्ञांनी बुद्धी, कल्पना, लयबद्धता, भावना यांना प्राधान्य देऊन काव्याची–साहित्याची व्याख्या करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो तो पुढीलप्रमाणे –

1) The best words in best order - कोलरीज

( उत्तम शब्दांची उत्तम रचना म्हणजे काव्य)

2) Poetry is musical thought – कार्लाईल

(लयबद्ध विचार म्हणजे काव्य )

3) The spontaneous overflow of powerful feelings- वर्डस्वर्थ [२]

(उत्कट भावनेचा उत्स्फूर्त उद्रेक म्हणजे काव्य)

अशा पद्धतीने साहित्याचा विविधांगी परामर्श घेणाऱ्या व्याख्या पौर्वात्य तसेच पाश्चात्य साहित्यशास्त्रज्ञांनी केलेल्या आहेत. या साहित्य चर्चेबद्दल विद्या व्यवहारे म्हणतात, ''साहित्य मीमांसकांनी केलेल्या या साहित्य चर्चेत साहित्यातील वाड्.मय गुणांचाच विचार केलेला आहे... त्यावरुन 'साहित्य' म्हणजेच वाड्.मय व साहित्य हे अन्य लेखनाहून वेगळे असते. याचा बोध आपणास होतो. साहित्याचे हे वेगळेपण लेखकाच्या प्रतिभास्पर्शाने, संस्काराने, शब्दार्थाच्या सूचकतेमुळे येते.... तेव्हा साहित्य म्हणजे असे लेखन की, ज्यात शब्दार्थांना एक रमणीय अर्थ असतो. भाव, कल्पना, विचार, शैली इत्यादीतून हे रमणीयत्व, लालित्य आलेले असते. त्यामुळे हे लेखन लक्षणीय बनते. वाचकांना त्याच्या आस्वादातून एक प्रकारचा आनंद प्रत्यय येत असतो. काव्य, कथा, कादंबरी, नाटक यांचा समावेश साहित्यात असतो. लालित्य हा साहित्याचा महत्त्वाचा गुणधर्म आहे.''[३]

डॉ.व्यवहारे यांचे हे विचार अगदी यथार्थ वाटतात. प्रा.वा.ल. कुलकर्णी ललित साहित्याचे स्वरूप सांगताना म्हणतात, ''ललित साहित्य हे मूलत: व्यक्तिनिष्ठ, भावप्रेरित, कल्पनाप्रचूर, प्रतिभानिर्मित, सौंदर्यसिद्धीच्या नियमाचे अनुकरण करणारे, वैशिष्टयपूर्ण सुसंघटन असणारे आणि ज्याच्या आशयाची नेमकी अटकळ बांधता येत नाही असे आहे.''[४]

यावरून आपणास साहित्य म्हणजे काय याची नेमकी कल्पना येते.

## साहित्य आणि जीवन :

साहित्य ही एक व्यक्तिमनाची नवनिर्मिती असते. लेखक, कवी आपल्या अनुभूती, आपले अनुभवविश्व साहित्यातून व्यक्त करीत असतो. याचाच अर्थ असा की, साहित्याचा जीवनानुभवाशी संबंध असतो. साहित्याची निर्मिती ही व्यक्तिमनाची निर्मिती असली तरी व्यक्ती जीवनाबरोबरच समाजजीवनाशीही साहित्याचा संबंध असतोच. जीवनदर्शन हा

साहित्याचा एक महत्त्वाचा विशेष त्यामुळेच मानला जातो. त्याचबरोबर साहित्य हे समाजजीवनाचे अपत्य आहे असेही म्हटले जाते.

साहित्य आणि जीवन यांच्यातील नाते अतुट असते. म्हणूनच तर मॅथ्यू अर्नोल्ड, 'साहित्य म्हणजे जीवन भाष्य असे म्हणतो'. तर सुप्रसिद्ध फ्रेंच समाजशास्त्रज्ञ हिप्पोलिन तेन आपल्या समाजशास्त्रीय समीक्षा पद्धतीत साहित्यावर देश, काल, परिस्थिती या त्रिसुत्रींचा कसा प्रभाव पडतो, हे सांगतो. साहित्य हा जीवनाचाच एक अविभाज्य भाग असल्याने जीवनात घडणाऱ्या घटना साहित्यात चित्रित होणे अपरिहार्य ठरते. साहित्याचा सारा डोलाराच समाजजीवनावर उभारलेला आहे. हे साहित्याच्या परिशीलनातून आपल्या लक्षात येते. अलिकडे तर साहित्य आणि समाजजीवन यांचे नाते अधिक दृढ होत असल्याचे दिसते.

जीवन आणि साहित्य यांच्यातील परस्पर सबंधाचा शोध घेण्याचा प्रयत्न करता असे दिसते की, बाराव्या तेराव्या शतकातही ज्या सांस्कृतिक चळवळी झाल्या त्याचा पडसाद साहित्यात उमटलेला आहे. स्वातंत्र्योत्तर कालखंडात ज्या सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय चळवळी झाल्या त्याचा परिणाम साहित्यावर झालेला पहावयास मिळतो.

**वाङ्.मयीन चळवळी:**

समाजात परिवर्तन झाले की, त्याचे पडसाद वाङ्.मयात उमटतात. त्यातूनच विविध वाङ्.मयीन चळवळी जन्म घेतात. मग मध्ययुगातील वाङ्.मयीन चळवळी असोत की पुढील काळातील वाङ्.मयीन चळवळी असोत. चळवळीचे कारण हे समाजजीवनात असते. समाजजीवनातील चळवळींचा परिणाम सांस्कृतिक जीवनावर होतो व पर्यायाने या चळवळी वाङ्.मयातही येतात. मध्ययुगामध्ये झालेल्या चळवळी ह्या जनसामान्यांच्या अध्यात्मिक उन्नतीसाठी झाल्याचे दिसून येते. त्यातूनच महानुभाव आणि वारकरी यांनी जी चळवळ सुरू केली ती तत्कालीन सनातन्यांविरुद्ध. या चळवळी सनातनी विरुद्ध उदारमतवादी अशा होत्या. त्यातून परिवर्तन घडून आले. या परिवर्तनामुळे वाङ्.मयामध्येही उदारमतवाद

झाला. नवचैतन्य आले. डॉ. नागनाथ कोत्तापल्ले म्हणतात त्याप्रमाणे चळवळींचे कारण जीवनातील प्रश्नात असते. जेव्हा जेव्हा जीवनात प्रश्न निर्माण होतात तेव्हा तेव्हा जीवनात आणि त्याचबरोबर वाड्.मयीन क्षेत्रातही चळवळी आकारास येतात. वाड्.मयीन चळवळींचे कारण जीवनातील प्रश्नात, समस्येत असते. हे प्रश्न तत्कालीन समाजव्यवस्थेने राजकीय, धार्मिक स्थितीने निर्माण झालेले असतात. हेच प्रश्न सोडविण्यासाठी चळवळी आकारास येतात.

## दलित व ग्रामीण साहित्याची चळवळ :

माणसाच्या जीवनातील प्रश्न जेव्हा गंभीर बनतात. जीवनात विकृती येऊ लागते, माणसातील माणूस हरवू लागतो, माणसाचा जीवनावरचा विश्वास उडू लागतो. या सर्व प्रश्नांचे गांभीर्य समाजातील काही सुजाण लोकांच्या लक्षात येते तेव्हा चळवळी आकारास येतात आणि मग त्यांचे पडसाद वाड्.मयातही उमटतात. मराठी वाड्.मयात दलित आणि ग्रामीण साहित्याच्या प्रवाहाविषयी असाच अनुभव आहे. दलितांच्या आणि ग्रामीणांच्या जीवन जाणिवा जागृत होऊन, जीवनातील उग्र प्रश्न सोडविण्यासाठी ज्या चळवळी झाल्या त्यातून मराठी वाड्.मयात दलित आणि ग्रामीण साहित्याचा प्रवाह अधिक समृद्ध होत गेला.

मराठी वाड्.मयाचा अभ्यास करताना या वाड्.मयाचे काळानुरूप काही कालखंड मानल्याचे आपल्या लक्षात येते, यामध्ये असलेल्या साठोत्तरी मराठी साहित्यामध्ये ग्रामीण, दलित, स्त्रीवादी, आदिवासी, जनवादी इत्यादी वाड्.मयीन प्रवाह निर्माण झाले. या सर्व प्रवाहांमध्ये महत्त्वाचा वाड्.मयीन प्रवाह म्हणजे ग्रामीण साहित्याचा प्रवाह होय. महात्मा जोतिबा फुले यांची मुख्य प्रेरणा असलेल्या या साहित्य प्रवाहात प्रामुख्याने ग्रामीण लोकांच्या सुखदु:खांचा, व्यथा-वेदनांचा, श्रद्धा-अंधश्रद्धांचा, रूढी-परंपरांचा चर्चेचा विषय होतो. या साहित्यामधून ग्रामीण जीवनाचे वास्तव चित्रण अतिशय बोलक्या व जिवंत पद्धतीने मांडल्याचे दिसून येते.

## ग्रामीण म्हणजे काय?

मराठी वाड्.मयाच्या समृद्धीमध्ये मराठी ग्रामीण वाड्.मयाने भरच टाकली आहे. तरीही ग्रामीण म्हणजे नेमके काय? ग्रामीण जीवन म्हणजे काय? ग्रामीण जीवनाचे स्वरूप कोणते? त्यातील ग्रामीण वास्तवाचे स्वरूप कोणते? याबद्दल मात्र संभ्रम आहे. आजही आपल्या देशात ७०% जनता खेडयापाड्यातून राहते. तेव्हा या ग्रामीण भागातून सर्व दूर पसरलेल्या समाजाची स्वत:ची अशी एक संस्कृती निर्माण झाली आहे असे दिसते. भारतीय खेड्याची रचना, समाजव्यवस्था, बघीतली तर पुष्कळबाबी स्पष्ट होत जातील. या समाजरचनेची स्वत:ची अशी एक स्वतंत्र व स्वयंपूर्ण रचना आहे. युगानयुगापासून चाललेल्या या रचनेत माणसे एका विशिष्ट पद्धतीने बांधली जातात. त्यांची स्वतंत्र अशी एक ग्रामसंस्कृती असते व त्या ग्रामसंस्कृतीशी माणूस पक्का बांधला जाई. तो ग्राम संस्कृतीच्या आंतररचनेमुळे, विठ्ठल रामजी शिंदे यांनीही या व्यवस्थेबद्दल गौरवोद्‌गार काढले आहेत. ते म्हणतात, ''सरंजाम ही मराठ्यांची लष्करी घटना आहे. तर गावगाडा ही कुणब्यांची मुलकी घटना आहे. ... खेड्याचा राजा पाटील... ब्राह्मणांपासून ते महारामांगापर्यंत सर्व जातींचे अलुते-बलुते उर्फ कारु-नारु यांची वासरे. ही गावगाड्याची घटना व परिभाषा फार पुरातन आहे. या देशात अनेक राजव्यवस्था आल्या आणि गेल्या परंतु ग्रामव्यवस्था कायमच राहिली.'' [५]

विशेषत: ग्रामीण साहित्याची चळवळ सुरु झाल्यापासून ग्रामीण साहित्याबद्दल काही एक प्रतिकूलही बोलले जाऊ लागले आहे. गेल्या ८० वर्षापासून लिहिल्या गेलेल्या ग्रामीण साहित्याने मराठी साहित्यात लक्षणीय भर टाकली असली तरी समीक्षेच्या दृष्टीने नागर साहित्याच्या मानाने ग्रामीण साहित्य उपेक्षितच राहिल्याचे वाटते. त्याबद्दल आस्थेवाईकपणे चर्चा झाली नाही हे सत्य आहे. या संदर्भात प्रा. गो. म. कुलकर्णी म्हणतात, ''ग्रामीण साहित्य रूढ होऊन आज कितीतरी काळ लोटला आहे. 'ग्रामीण' या विशेषणाने वलयांकित होणारे साहित्यही विपुल प्रमाणात होत आहे. तथापि, या साहित्याच्या प्रेरणा, स्वरूप आणि

समस्या यांचे सविस्तर उपपादन करणारी समीक्षाकृती आजही उपलब्ध नाही. ग्रामीण साहित्याच्या कितीतरी मागून आलेल्या (आणि तिखट झालेल्या) दलित साहित्यावर बघता बघता चार–सहा ग्रंथ पैदा व्हावेत आणि ग्रामीण साहित्याचा परामर्श घेणारा एकही ग्रंथ मात्र उपलब्ध होऊ नये हे चमत्कारिकच नव्हे काय? दलित साहित्याला चढलेल्या भरतीची संगती लावणे अवघड नाही. पण ग्रामीण साहित्याच्या तिव्र उपेक्षेची कारणे मात्र नीटशी न उमगणारी. ग्रामीण साहित्य हे पृथगात्म न मानता, मध्यवर्ती मराठी साहित्याचीच एक रेषा मानली गेल्याचा हा परिणाम असावा. कारणे कोणतीही असोत या साहित्याची समीक्षादृष्ट्या आबाळ झाली. या वस्तूस्थितीत फरक पडत नाही.''[६]

हे प्रा. गो. म. कुलकर्णी यांचे विधान वास्तवदर्शी आहे. हे विधान करून १७–१८ वर्षे लोटली आहेत. या कालावधीत ग्रामीण साहित्यसंबंधी काही पुस्तके प्रसिद्ध झाली असली तरीही ग्रामीण साहित्यातील महत्त्वाचा घटक 'ग्रामीण' याचा विचार म्हणावा तितका झाला नाही. आणि असा विचार करण्याची गरजच नाही असेही प्रा. वा. ल. कुलकर्णी यासारख्या समीक्षकाला वाटते. ते म्हणतात– ''आपण ग्रामीण साहित्य, ग्रामीण साहित्य म्हणून या साहित्याचे किती दिवस कौतुक करणार आहोत. या पलिकडे जे जीवन समजून घेतले असते ते पाहिले पाहिजे.''[७]

जीवन समजून घेतले पाहिजे, हे तर खरेच परंतु ग्रामीण साहित्याचे कौतुक कधी झाले हे मात्र कळत नाही. आणि 'ग्रामीण' म्हणजे नेमके काय? ते नीट कळल्याशिवाय कौतुक तरी कसे करता येणार हा प्रश्नच आहे. ग्रामीण म्हणजे नेमके काय? ग्रामीणत्व कशात आहे. याची मराठीमध्ये चर्चा झाल्याचे दिसत नाही. पुष्कळदा 'ग्रामीण' आणि प्रादेशिक 'ह्या शब्दांवरच चर्चा होते आणि याशिवाय ग्रामीण म्हणजे अज्ञान, अंधश्रद्धा आणि रूढी प्रियता असेही म्हटले जाते. पण या गोष्टी आज मुंबईसारख्या महानगरामध्येही दिसतात. त्यामुळे केवळ रुढीप्रियता, केवळ अंधश्रद्धा म्हणजे ग्रामीण जीवन नाही. याच्या पलिकडे कुठेतरी ग्रामीणतेचा शोध घ्यावा लागेल.

हा शोध घेत असताना प्राचीन काळापासून खेड्याची झालेली जडणघडण व त्यातून निर्माण झालेली जीवन जगण्याची एक रीत लक्षात घ्यावी लागेल. ही रीत म्हणजेच 'ग्रामीणत्व' असे म्हणता येऊ शकेल. ही रीत मात्र प्राचीन काळापासून नागर जीवनापेक्षा वेगळी आहे.

## ग्राम संस्कृतीचे स्वरुप :

भारतीय खेड्याची रचना, समाजव्यवस्था बघितली की, या जगण्याचे वेगळेपण लक्षात येते. येथील माणसांची जगण्याची एक विशिष्ट अशी रीत साकारलेली आहे. ग्रामीण भागामध्ये काळी आणि पांढरी असे दोन शब्द जुन्या काळापासून प्रचलित आहेत. काळी म्हणजे भूमी, शेती. या भूमीच्या दृष्टीने, शेतीच्या दृष्टीने पांढरीचीही उभारणी होत असते. या पांढरीमध्ये कोणते घर कुठे असावे, मंदिर कुठे असावे, पाटलाचे घर कुठे असावे, हे ही ठरलेले असते. ह्या बाह्यरचनेबरोबरच एक आंतररचनाही साकार झालेली दिसते. ग्रामीण संस्कृतीही प्राचीन काळापासून कृषिकेंद्रीत संस्कृती होती. या कृषिकेंद्रीत संस्कृतीच्या रचनेलाच 'गावगाडा' म्हटले गेले आहे.

या गावगाडयामध्ये कारू-नारू हे घटक महत्त्वाचे होते. ह्या गावगाड्याचा अभ्यास सुमारे १०० वर्षापूर्वी श्री. त्रि. ना. अत्रे यांनी केला आहे. त्यामध्ये ते म्हणतात की, ''खेडे म्हटले की अगोदर चटकन काळीच डोळ्यापुढे उभी राहते. शेते, पिके, गवत, झाडे, गुरेढोरे, शेळ्यामेंढ्या, मेंढके, शेतकरी, गुराखे, पार, विहिरी, नांगर, कुळव, मोट, मळा, गोफण वगैरे बळीराजाचे वैभव खेड्याचे नाव काढताच इतके मन व्यापून टाकते की, खेड्यात शेतीखेरीज दुसरा रोजगार चालत असेल किंवा शेतकऱ्यांखेरीज दुसरे कोणी राहत असेल असे एकाएकी मनातही येत नाही. कुणबी पुढे झाल्याखेरीज एकाही खेड्याची वसाहत झाली नाही. त्याने धान्य पैदा करून इतरांच्या खाण्याची तरतूद केली. तेव्हा इतर गोळा झाले.''[८]

अशापद्धतीने त्यांनी खेड्याचे अतिशय मनोज्ञ चित्र रेखाटले म्हणूनच त्यांनी " Notes on rural sociology and village problem with special referance to

Agriculture." असे उपशीर्षक या ग्रंथाला दिले आहे. हा ग्रंथ ग्रामीणता समाजवून घेण्यासाठी अतिशय उपयुक्त आहे.

यावरून हे स्पष्ट होते की, कृषिजीवन हेच ग्रामसंस्कृतीच्या केंद्रस्थानी आहे. किंबहुना कृषिजीवनाला केंद्रस्थानी ठेवूनच इथले सण, उत्सव, परंपरा, रूढी या गोष्टी निर्माण झाल्या आहेत. पोळा, दसरा, दिवाळी, गुढीपाडवा, अक्षयतृत्तीया इ. सणांचे नाते केवळ कृषिसंस्कृतीशीच आहे हे उघड आहे. संपूर्ण भारतीय संस्कृतीच मुळी 'कृषिनिष्ठ' आहे. ग्रामीण भागातून दिसणाऱ्या मातृपूजेचा संबंधही शेतीशीच आहे. शेती म्हणजे निर्मिती, जनन. म्हणूनच स्त्रीरूपाची आणि शेतीची सांगड पुरातन काळापासून घातली आहे. म्हणूनच पाऊस पडला नसला तर नग्न स्त्रियांकडून नांगरून घेण्याची प्रथाही याच श्रद्धेतून आलेली दिसते. साहित्यातून स्त्री आणि भूमी यांचे एकत्व सतत प्रकट केले जाते. ''पृथ्वीमाते, मंगल गे अन्न तू आम्हा दिले'' असे मंगेश पाडगावकर म्हणतात. त्यामागे हीच जाणीव आहे आणि ना. धों. महानोर जेव्हा म्हणतात–

''या नभाने या भुईला दान द्यावे [९]

आणि या मातीतुनी चैतन्य गावे''

तेव्हाही भूमीही स्त्रीरूपातच प्रकट होते. भूमीला 'काळी आई' म्हटले जाते, तेही याच अर्थाने.

या संस्कृतीतील एक अतिशय महत्त्वाचा घटक म्हणजे निसर्ग. निसर्गाशिवाय ग्रामीण जीवन संभवूच शकत नाही. आणि हा निसर्ग लहरी असतो. त्यामुळे माणसाने निसर्गाला दैवत्व बहाल केले. निसर्ग, गुढ, अनाकलनीय, अपरिनित आणि अतर्क असल्यामुळेच माणूस आदिम बाबींशी बांधला जातो.

''कोणती पुण्ये अशी येती फळाला

जोंधळ्याला चांदणे लखडून जावे'' [१०]

असे ना. धों. महानोर म्हणतात. तेव्हा निसर्गापुढची मानवी आदिम जाणीव व्यक्त होते असे म्हणावे लागते.

अशाप्रकारे ग्रामीण माणसाची जगण्याची रीत, काळी आणि पांढरी, कृषिकेंद्रीयता, निसर्ग सन्मुखता यातून ग्रामसंस्कृतीचे आपणास दर्शन घडते.

## ग्रामीण आणि नागर यातील भेद :

ग्रामीण आणि नागर या दोन संज्ञा कधी निर्माण झाल्या ते निर्णायकपणे सांगणे अवघड आहे. तरी या दोन संकल्पनामध्ये अनेकार्थाने विरोध आहे. जीवनाच्या सर्व पातळ्यांवर ह्या संकल्पना वेगळा अर्थ घेऊन उभ्या राहताना दिसतात. या दोन्ही विभागामध्ये आदान प्रदान होताना दिसते. अर्थात या दोन्ही संकल्पना ठसठशीतपणे जाणवू लागल्या. त्या मात्र औद्योगिकरणानंतरच. आता शहरीकरणामुळे ग्रामीण आणि शहरी या संकल्पना अधिक रूढ होऊ पाहत आहेत. ग्रामीण शिक्षण, ग्रामीण राजकारण, ग्रामीण अर्थकारण या आणि यासारख्या संकल्पना एक विशिष्ट अशी जीवनपद्धती ध्वनित करतात.

साधारणत: १९२० च्या दरम्यान 'ग्रामीण' जीवन ठळकपणे वेगळे असल्याचे जाणवू लागले होते. इतकेच नव्हे तर या ग्रामीण जीवनाची घडणही वेगळी असल्याचे म्हटले जाऊ लागले होते. महात्मा गांधी यांनी 'खेड्याकडे चला' अशी हाक या ऐतिहासिक टप्प्यावर दिली. याचाच अर्थ शहरे आणि खेडी यामधील अंतर ठळकपणे यावेळेस नजरेत भरू लागल्याचे दिसते.

प्राचीन काळापासून 'नागरी' आणि 'ग्रामीण' हे दोन्ही शब्द अस्तित्वात आहेत. प्राचीन काळात आणि मध्ययुगातही नगरे अस्तित्वात होती. भारताचे प्रमुख वैशिष्ट्ये मानल्या गेलेल्या शेतीशी या नगरांचा दुरान्वयानेच संबंध यायचा आणि येत असतो. अर्थात 'नागर' आणि 'ग्रामीण' या दोन्ही विभागामध्ये काही आदान प्रदान चालत होते हे उघड आहे

इंग्रजांच्या आगमनानंतर म्हणजेच औद्योगिकरणानंतर 'ग्रामीण' आणि 'नागर' या संज्ञा जाणवू लागल्या. १८८० च्या दरम्यान औद्योगिकरणाला प्रारंभ झाल्यानंतर आपल्याकडे मोठ्या प्रमाणावर कापड कारखाने शहरांमधून स्थिर होऊ लागले. रेल्वे

बरोबरच इतर सुविधा उपलब्ध झाल्या आणि देशात एक प्रक्रिया सुरू होऊन खेड्यातील लोक शहराकडे वळू लागले. महाराष्ट्रापुरते बोलायचे तर कोकणातून आणि इतर महाराष्ट्रातून लोकांचा लोंढा मुंबईकडे येऊ लागला. शहरांची महानगरे होऊ लागली आणि 'ग्रामीण' 'नागर' हा भेद अधिकच स्पष्ट होऊ लागला..

## सार्वत्रिक शिक्षणाचा परिणाम :

'ग्राम' आणि 'नागर' ह्या जुन्याच संज्ञा असल्या आणि त्यात सीमारेषा असली तरी ती वाढवायला कारण झाले ते औद्योगिकरण. याबरोबरच आणखी एक महत्त्वाचे कारण घडले ते म्हणजे इंग्रजांनी आणलेली सार्वत्रिक शिक्षण पद्धती. या पद्धतीचे दूरगामी परिणाम देशावर झाले. पण शिक्षण हे प्रारंभी पुणे, मंबई सारख्या शहरांमध्ये केंद्रीत झाले. ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार सुरू व्हायला कर्मवीर भाऊराव पाटलांसारखी ध्येयाने पछाडलेली माणसे व्हावी लागली. तरीही शिक्षणाचा खरा प्रचार आणि प्रसार स्वातंत्र्यानंतरच सुरू झाला. नव्या शिक्षणामुळे ग्रामीण आणि शहरी ह्या दोन संज्ञा अधिक ठळक झाल्या. त्याचबरोबर या आधुनिक शिक्षणामुळे खेड्यातून माणूस तुटत गेला. पोट भरण्यापायी शहरांकडे धावला. त्यामुळे शहरे अवाढव्य झाली. त्यातूनच अर्थव्यवस्थेची केंद्रे ही शहरे झाली. याविरुद्ध सुरवातीस महात्मा फुलेंनी आवाज उठविला.

याचाच अर्थ असा की, औद्योगिकरण, नवे शिक्षण जसजसे वाढत गेले तसतसे शहरे आणि खेड्यातील अंतर वाढत गेले अर्थव्यवस्थेत जसे बदल झाले तसे हे अंतर वाढत गेले आणि त्यातूनच 'ग्रामीण' ही संज्ञा आकाराला आली.

## ग्रामीण साहित्य म्हणजे काय?

ग्रामीण साहित्य याबाबत विचार करताना ग्रामीण साहित्य म्हणजे नेमके काय? ग्रामीणांनी लिहिलेले काय? त्याचे स्वरूप कसे असायला हवे? कोणत्या घटकांमुळे त्या साहित्याला ग्रामीण साहित्य म्हणायचे? या बाबींचा विचार होणे आवश्यक आहे.

ग्रामीण साहित्य म्हणजे काय हे सांगताना गो.म. कुलकर्णी म्हणतात, ''ग्रामीण साहित्य म्हणजे खेडेगावातील कृषीवर निर्वाह असलेल्या स्पृश्य शेतकऱ्यांच्या आणि स्पृश्य शेतमजुरांच्या जीवनावर आधारलेले साहित्य होय.''[११] तर तत्रैव मध्ये ग्रामीण साहित्याबद्दल 'ज्यात आजचे वा कालचे ग्रामीण जीवन त्याचे मनोव्यापार, सांस्कृतिक संवेदन सखोलपणे आणि सर्वांगिण स्वरूपात व्यक्त होते असे साहित्य म्हणजे ग्रामीण साहित्य....' अशी संकल्पना मांडली आहे.

याचबरोबर ग्रामीणता स्पष्ट करताना ग्रामीणतेशी अतूट नाळ जोडलेले प्रतिथयश ग्रामीण लेखक प्रा. आनंद यादव म्हणतात. ''खेडेगाव तेथील जीवनपद्धती, तेथील अशा रीती, शेती, निसर्गाशी, मातीशी असलेला मानवी पण प्रदेशनिष्ठ वैशिष्ट्यपूर्ण संबंध, तेथील एकूण संस्कृतीला लाभलेली काही प्रादेशिक वैशिष्ट्ये, मानवीजीवनाला त्या त्या प्रदेशानुसार पडलेल्या आर्थिक, सामाजिक, धार्मिक, ज्ञानविषयक मर्यादा व त्यातून उद्‌भवणारे प्रश्न आणि समस्या इत्यादी गोष्टीनुसार अनुभूतीला लाभलेली वैशिष्ट्ये ग्रामीण साहित्यात येतात.''[१२] ग्रामीण साहित्य म्हणजे काय हे सांगताना नागनाथ कोत्तापल्ले म्हणतात, ''ग्रामीण जीवनातून फुलणारे, ग्रामीण वास्तवातून साकार होणारे साहित्य ते ग्रामीण साहित्य.''[१३]

वरील व्याख्यांवरून ग्रामीण साहित्याची कल्पना येते. व या ग्रामीण साहित्याच्या अभ्यासकांचे विवेचन योग्य वाटते. कारण खेडे म्हटले की, निसर्ग आणि शेतीशी तेथील मानवी जीवनाचा संबंध अपरिहार्यपणे येतच असतो. त्यांची विशिष्ट अशी जगण्याची रीत असते. त्यामुळे काही मर्यादाही या जीवनात जाणवतात. शेतीवरच या लोकांचे आर्थिक व्यवहार पार पडत असतात.

एकंदरीत ग्रामीण साहित्याच्या 'ग्रामीण' या संकल्पनेत ग्रामीण जीवन हा अर्थ अभिप्रेत आहे. ग्रामीण माणसाचे जगणे, त्याचा व्यवसाय, कृषी संस्कृतीशी त्याचे असलेले नाते, ग्रामीण जीवनातील आचार-विचार, रुढी-प्रथा, भाव-भावना, ताण-तणाव, त्यांच्या जगण्यातील प्रश्न, त्यांची जीवनाकडे पाहण्याची दृष्टी इत्यादींना ग्रामीण या संकल्पनेत

महत्त्व आहे. अशा या ग्रामीण जीवनाचा आविष्कार घडविणारे साहित्य म्हणजेच ग्रामीण साहित्य असे म्हणता येते. या साहित्यामध्ये ग्रामीण जीवन विषयक जाणीवा असणे महत्त्वाचे ठरते. या साहित्यातील आशय ग्रामीण जीवनाशी निगडीत असतो.

**ग्रामीण साहित्य निर्मिती, प्रेरणा व स्वरूप :**

१९२० च्या नंतर जाणीवपूर्वक ग्रामीण साहित्याची निर्मिती झाल्याचे दिसून येते. कारण १९२० च्या दरम्यानच 'ग्रामीण' जीवन ठळकपणे वेगळे असल्याचे जाणवू लागले होते. ग्रामीण जीवनाची घडणही वेगळी असल्याचे म्हटले जाऊ लागले होते. त्यातच म. गांधीनी 'खेड्याकडे चला' अशी ऐतिहासिक हाक दिल्यावर संपूर्ण भारत वर्षावर या ऐतिहासिक हाकेचा परिणाम झाला. औद्योगिकरणामुळे बदलत्या जीवनाचा व अर्थव्यवस्थेचा परिणाम म्हणून 'ग्राम इलाखा' केंद्रस्थानी ठेवून देशाच्या अर्थव्यवस्थेचे नियोजन करावे असे गांधीजींना वाटत होते. त्यासाठीच त्यांनी मुलोद्योगप्रणित शिक्षणाचा विचार मांडला. हे सारे १९२० च्या दरम्यान जोर धरु लागले आणि त्यातूनच शहरे आणि खेडे यातील अंतर ठळकपणे दिसू लागले.

तसे पाहिजे तर १९ व्या शतकातच ग्रामीण लेखनाची सुरवात झाल्याचे दिसून येते. लोकहितवादी यांनी लिहिलेल्या 'ग्रामरचना' या छोटेखानी ग्रंथात त्यांनी शेतीविषयक विचार, ग्रामीण भागाची दुरावस्था व शेतकऱ्यांचे दारिद्रय इत्यादी महत्त्वाच्या प्रश्नांचे निरीक्षण केले. तर ताराबाई शिंदे यांनी आपल्या 'स्त्री-पुरूष' तुलना या निबंधात कारागिरांची कामगिरी संपत असल्याचा निर्देश केला आहे. हे कारागिर म्हणजेच खेड्याचे अविभाज्य घटक होते. या वास्तवाचा प्रखर आविष्कार झाला आहे तो म. फुले यांच्या 'शेतकऱ्यांचा आसूड' या ग्रंथामध्ये शेतकरी आणि एकूण ग्रामीण इलाखा कसा होरपळून निघतो आहे; याचे फार प्रभावी व ह्द्‌यस्पर्शी चित्रण त्यांनी केले आहे. यासाठी तत्कालीन दुष्काळी परिस्थितीही कारण ठरली. शेतकऱ्यांचे लढेही भारतभर उभे राहिले. महाराष्ट्रात जे लढे झाले ते 'डेक्कन रॉयटस्' या नावाने ओळखले जाऊ लागले.

ग्रामीण साहित्याच्या प्रेरणांबद्दल आनंद यादव म्हणतात, "१९२० नंतर अनेक घटनांचा परिणाम होऊन साहित्यिकांची दृष्टी खेड्याकडे वळली, तेथे आपले भारतीय जीवन आहे. तेथील लोकांचा उद्धार झाला पाहिजे. त्यांच्या जीवनातील विषमता, दारिद्रय, अज्ञान, परंपराप्रियता नाहीशी झाली पाहिजे. त्यांच्यात अभिमान जागृत करून त्यांना स्वातंत्र्य सन्मुख केले पाहिजे. अशा प्रकारच्या राजकीय आणि सामाजिक जाणीवांनी ग्रामीण साहित्यिकांना खरी प्रेरणा मिळाली."[१४]

ग्रामीण साहित्याच्या निर्मितीमागे महात्मा फुले, सयाजीराव गायकवाड, राजर्षी शाहू, कर्मवीर भाऊराव पाटील, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या विचारवंतांच्या विचारांची प्रेरणा कारणीभूत आहे. महात्मा फुले यांनी प्रत्यक्ष कृती व वाङ्.मय यांच्या माध्यमातून लोकांना जागृत करण्यासाठी 'शेतकऱ्यांचा आसूड' 'गुलामगिरी' आणि 'तृतीय रत्न' या वाङ्.मयकृती निर्माण केल्या. त्यातून शेतकऱ्यांची दयनीय अवस्था मांडून शेतकऱ्याच्या उत्कर्षासाठी ज्वाज्वल विचार मांडून त्यांना आत्मभान देऊन त्यांचा आत्मविश्वास वाढवला. त्यामुळे ग्रामीण साहित्याच्या चळवळीचे म. फुले हे पहिले प्रवर्तक मानले जातात. त्यांनी आपल्या लेखनातून समाजाला एक नवा विचार दिला.

राजर्षी शाहू महाराज म्हणतात, "आर्थिक कार्यक्रमात शेतीला अग्रक्रम दिला पाहिजे. शेती उत्पादन वाढवल्याशिवाय शेतीची स्थिती सुधारणार नाही. आणि शेतकरी आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी व स्वयंपूर्ण बनल्याशिवाय राष्ट्रोद्धार अशक्य आहे."[१५]

त्याचबरोबर तळागाळातील गरीबांची मुले शिकली पाहिजेत म्हणून जीवन झिझवणारे कर्मवीर, खेड्यातून भारत शोधू पहाणारे गांधीजी आणि गोरगरीब पद्‌दलितांना शिक्षणाची कास धरावयास सांगून आत्मभान देणारे डॉ.बाबासाहेब आंबेडकर ह्या सर्वांची विचारसरणी ग्रामीण साहित्याच्या प्रेरणेस कारणीभूत ठरली. याबद्दल ग्रामीण साहित्य परिषदेच्या घटनेत, "ही चळवळ फुले, शाहू, आंबेडकरांच्या विचार कर्तृत्त्वाशी पूरक अशा भूमिकांचा स्वीकार करते."[१६] अशी स्पष्ट नोंद आहे.

असे असले तरी 'ग्रामीण' आणि 'शहरी' या दोन संज्ञा १९२० नंतर अधिक अर्थपूर्ण झाल्या. म.गांधींबरोबरच डाव्या चळवळींना प्रारंभ झाला आणि सदाशिव पेठेबाहेर मोठा समाज आहे याचे भान येऊ लागले. मराठी लेखक, कवी ग्रामीण जीवनाचे चित्रण केले पाहिजे असे म्हणू लागले. मराठीत जानपद गीतांच्या रूपाने ग्रामीण कविता येऊ लागली. याच गीतांना किसान गीते, गोपगीते असे म्हटले जाऊ लागले. याच ऐतिहासिक टप्प्यावर वि.स. सुखटणकरांच्या रूपाने 'प्रादेशिक' साहित्य येऊ लागले. म्हणजेच 'जानपद साहित्य' आणि 'प्रादेशिक साहित्य' साधारणत: १९२० नंतर मराठीत सुरू झाले असे म्हणता येईल.

वि.स.सुखटणकरांबद्दल आनंद यादव म्हणतात, ''ग्रामीण जीवनाविषयीच्या वाङ्.मयीन जाणीवा मराठी साहित्यात प्रथम वि.स. सुखटणकर यांनी निर्माण केल्या. १९३१ साली त्यांनी 'सह्याद्रीच्या पायथ्याशी' हा आपला आठ प्रादेशिक कथांचा संग्रह प्रसिद्ध केला. या कथा संग्रहाला त्यांनी 'आजचे व कालचे गोमंतक' असे पर्यायी नाव दिले व संपूर्ण गोमंतकांचे दर्शन घडविण्याचा प्रयत्न केला आहे. ग्रामीण जीवनाकडे वळण्याची त्यांची ही जाणीव तत्कालीन इतर कुठल्याही लेखकापेक्षा वेगळी होती.''[१७]

१९२० नंतर ग्रामीण साहित्याच्या निर्मितीला प्रारंभ झाला. जानपद चे ग्रामीण कधी झाले हे निश्चितपणे सांगता येत नसले तरी साधारणत: श्री. म. माटे लिहू लागल्यानंतर 'ग्रामीण' ही संज्ञा रूढ झाली असावी असे वाटते. माटेंसारख्या लेखकांनी ग्रामीण जीवन जवळून पाहिले व ते जीवन आपल्या शब्दात पकडण्याचा प्रयत्न केला. माटेंबद्दल डॉ.आनंद यादव म्हणतात- ''ग्रामीण जीवनातील प्रत्यक्षातील समस्या, रोजच्या जीवनातील छळणारे प्रश्न, हरघडी नडणारे दारिद्रय आणि अज्ञान, तरीही दिसून येणारी माणूसकी हे सर्व त्यांनी प्रथम पाहिले, आणि त्यातून आपली निष्कर्षवजा दृष्टी बनविली.''[१८]

काहीही असले तरी १९५० नंतर मराठीमध्ये वेगवेगळ्या वाङ्.मय प्रकारामध्ये ग्रामीण जीवन चित्रणाला प्रारंभ झाला. कविता, कथा आणि कादंबरी या तीन वाङ्.मय प्रकारामधून ग्रामीण जीवन प्रकट व्हायला प्रारंभ झाला. ग.ल. ठोकळ, र.वा. दिघे, वि. वा.

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

हडप, सोपानदेव चौधरी, यशवंत, गिरीश अशी काही कवी लेखकांची नावे प्रारंभीचे लेखक म्हणून सांगता येतील. यांच्या लेखनातून ग्रामीण जीवनाचे चित्रण दिसून येते. १९२० च्या आसपास सुरू झालेले ग्रामीण साहित्य आजही विविध अंगांनी विकसीत होत आहे. या साहित्याचा विशेष म्हणजे कविता, कथा, कादंबरी या वाङ्.मय प्रकारातून विपुलतेने लिहले जात आहे. त्या त्या काळातील महत्त्वाच्या लेखकांची नोंद करावयाची म्हटल्यास ग.ल.ठोकळ, र.वा.दिघे, वि.वा. हडप, श्री.म.माटे, व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील, आनंद यादव, रा. रं. बोराडे, उद्धव शेळके, मनोहर तल्हार, विश्वास पाटील, भास्कर चंदनशिव, ना. धों. महानोर, इंद्रजित भालेराव, कृष्णात खोत अशी नोंद करावी लागेल. त्या त्या काळात त्या त्या लेखकांचे, कविंचे काही एक महत्त्वही मान्य करण्यात आले होते आणि आहे.

**ग्रामीण साहित्याची चळवळ :**

ग्रामीण साहित्याच्या चळवळीतील ग्रामीण संकल्पनेत ग्रामीण जीवन अभिप्रेत आहे. ग्रामीण माणसाचे जगणे, त्याचा व्यवसाय, कृषिसंस्कृतीशी असलेले त्याचे नाते, ग्रामीण जीवनातील आचार विचार, रूढी-परंपरा, भाव-भावना, ताण-तणाव, त्यांच्या जगण्यातील प्रश्न, त्यांची जीवनाकडे पाहण्याची दृष्टी इत्यादींना ग्रामीण या संकल्पनेत महत्त्व आहे. या ग्रामीण जीवनाचा अविष्कार घडवणारे साहित्य म्हणजेच ग्रामीण साहित्य असे म्हणता येते. या साहित्यातील आशय ग्रामीण जीवनाशी निगडीत असतो. अशा जीवनानुभवांचा आविष्कार घडविणाऱ्या या जीवनविषयक जाणीवा व्यक्त करणाऱ्या साहित्याची चळवळ म्हणजे ग्रामीण साहित्याची चळवळ असे म्हटले जाते.

ग्रामीण साहित्याच्या चळवळीबद्दल डॉ. विद्या व्यवहारे म्हणतात, ''ग्रामीणांच्या समस्यांना वाचा फोडण्यासाठी, ग्रामीणांच्या शोषणाविरूद्ध आवाज उठवण्यासाठी, शेतकऱ्यांचे प्रश्न मांडण्यासाठी, ग्रामीण जीवनविषयक जाणीवा प्रकट करण्यासाठी

साधारणत: १९७७ च्या आसपास ग्रामीण साहित्याची चळवळ उदयास आली.''[१९] विद्या व्यवहारेंचे हे मत अगदी संयुक्तिक वाटते.

१९७७ नंतर ग्रामीण साहित्याच्या चळवळीची भाषा सुरू झाली आणि एकूण मराठी साहित्य ग्रामीण चळवळीच्या, ग्रामीण साहित्याच्या बाबतीत प्रतिकूल अभिप्राय नोंदवू लागले. विशेषत: स्वातंत्र्य प्राप्तीनंतर ग्रामीण भागातून जन्मलेली पिढी आता लिहू वाचू लागली होती. तिला आपला गाव, गावातील माणसे आणि त्यांचे वास्तव भोवतीच्या ग्रामीण साहित्यात कुठेच नाही असे वाटत होते. ग्रामीणतेचे वास्तव दिसत नव्हते म्हणूनच नवशिक्षित लेखकांना वाटले आपण ते उलघडून पहावे.

साधारण १९७१ ते ७४ पर्यंत संपूर्ण महाराष्ट्र दुष्काळात होरपळून निघालेला होता आणि त्यामुळे नव्याने शिकलेली ग्रामीण भागातील नवी पिढी अंतर्मुख झाली. ज्या कृषिव्यवस्थेचा गौरव केला जात असे तिचे धिंडवडे निघालेलेच होते. हे एक तत्कालिक कारण असले तरी या निमित्ताने लेखक जागरूक झाला महाराष्ट्रात सर्वत्र दुष्काळ पण शहरांवर त्याचा काही परिणाम नाही हे नवेच वास्तव नव्या पिढीला जाणवायला लागले याचबरोबर ग्रामीण भागातील नवे प्रश्न जमीनीचे तुकडीकरण, सुशिक्षित बेकारी, नवी बी-बियाणे, नवी खते, निवडणुका ह्या प्रश्नांनी भोवंडून गेलेला शेतकरी हा नव्या लेखकांचा चिंतनाचा विषय बनला व त्यातून ग्रामीण साहित्याची चळवळ फोफावली.

दुष्काळ हे जसे ग्रामीण साहित्य चळवळीला कारण झाले. त्याचप्रमाणे आणखी एक कारण घडले ते म्हणजे शरद जोशी यांच्या शेतकरी संघटनेचे आंदोलन. साधारणपणे १९७२-७३ नंतर ही संघटना शेतकऱ्यांवर होणाऱ्या अन्यायाविरूद्ध लढा देऊ लागली. आणि भारत विरूद्ध इंडिया असा देश विभागतो आहे अशी आरोळी ठोकू लागली. यामुळे ग्रामीण भागात एक नवी जागृती झाली. ग्रामीण साहित्याच्या चळवळीला काही आधार प्राप्त झाला यात शंकाच नाही.

ग्रामीण साहित्याच्या चळवळीबद्दल आनंद यादव म्हणतात, 'ग्रामीण साहित्याची चळवळ ही म. फुले यांच्या मानवतावादाचा शुद्रातिशुद्रांवर व स्त्रीयांवर होणाऱ्या अन्यायाचा

व त्यांच्या विकासाचा, छोटे शेतकरी, खंडकरी, कुळे, कुणबी, शेतमजूर, खेड्यातून नागर विभागात पोटार्थी म्हणून आलेले.... मजूर, कामगार, दलित, आदिवासी यांच्या होणाऱ्या शोषणाचा वारसा सांगते. या सर्वांच्या विकास, उद्धारार्थ काळाच्या ओघात ज्यांनी ज्यांनी कार्य केले व विचार मांडले त्यांचा आणि त्यांच्या आवश्यक त्या विचारांचा ती वारसा सांगते. कुठल्याही एका व्यक्तीची किंवा विभुतीची ती पूजक नाही.''[२०] यादवांचे हे विचार यथार्थ असेच वाटतात.

ग्रामीण साहित्याची चळवळ सुरू करू इच्छिणाऱ्या लेखकांनी आपल्या भोवती भीषण वास्तवाचा अन्वयार्थ लावण्यासाठी आपले नाते जोडले ते थेट म. फुले यांच्याशी, त्यांच्या वाङ्‌मयाशी, किंबहुना जवळजवळ शंभर वर्षांनी म.फुले यांचा संदर्भ स्वीकारला गेला. ही बाब लक्षणिय आहे. म. फुले यांचे 'शेतकऱ्यांचे आसूड' व 'गुलामगिरी' हे ग्रंथतर महत्त्वाचे आहेतच, पण कृष्णराव भालेकर यांचे लेखनही अतिशय मोलाचे आहे. ''दैव दैव म्हणत शेतकरी कसा रसातळाला जातो. याची फार चांगली मीमांसा भालेकरांनी केली आहे. त्याचबरोबर कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांनी शेतीमालाच्या किंमतीचा प्रश्न सर्वप्रथम मांडला आहे. तसेच मुकुंदराव पाटील आणि जवळकर यांनी ग्रामीण भागातील असंतोषाचे मुळ कशात आहे. ते सांगितले आहे. अशा पद्धतीचा वैचारिक वारसा घेऊन ग्रामीण साहित्याच्या चळवळीने आकार घेतला आहे.

या चळवळीबद्दल विद्या व्यवहारे म्हणतात, ''ग्रामीण साहित्याची चळवळी ही एक साहित्यिक चळवळ आहे. ग्रामीण जीवनाशी नाते असलेल्या, त्यांच्या समस्या समजावून घेणाऱ्या, त्यांच्या भाव-भावना, त्यांच्या व्यथा-वेदनांनी व्यथित होऊन आपल्या साहित्यातून या जीवनाचा अविष्कार घडवू इच्छिणाऱ्या साहित्यिकांची ही चळवळ आहे.''[२१] व्यवहारे यांचे हे विचार अर्थपूर्ण वाटतात.

खऱ्या अर्थाने ग्रामीण साहित्याची चळवळ उभी करण्यामागे ज्यांचा वाटा आहे त्यात रा रं. बोराडे आणि आनंद यादव हे प्रमुख आहेत. आनंद यादवांनी तर वेगळी स्वतंत्र संमेलने भरवून ग्रामीण साहित्याचे वेगळेपण अधोरेखित करण्याचा प्रयत्न केला.

यांच्याबरोबर महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या साहित्यिकांनी आपल्या लेखनीने ग्रामीण जीवनशैली वास्तव रूपात आपल्या साहित्यात मांडल्याचे दिसते. त्यामध्ये भास्कर चंदनशिव, वासुदेव मुलाटे, श्रीराम गुंदेकर, इंद्रजीत भालेराव, श्रीकांत देशमुख, सदानंद देशमुख, विठ्ठल वाघ, रविंद्र शोभणे, प्रतिमा इंगोले, बाबुराव मसळे, शंकरराव मोहिते, तानाजी राऊ पाटील, मोहन पाटील, आनंद पाटील, शंकर पाटील, विश्वास पाटील, राजन गवस असे कितीतरी ग्रामीण लेखक कवी आज लिहित आहेत.

ग्रामीण साहित्याच्या चळवळीविषयी रा. रं. बोराडे म्हणतात, "ग्रामीण साहित्याची चळवळी ही काळाच्या गरजेतून निर्माण झाली आहे. त्यामुळे या चळवळीची गरज नाही असं म्हणताच येत नाही. शिक्षणाच लोण आता केवळ खेड्यात पोहचलेलं आहे अस नाही तर खेड्यातल्या निरनिराळ्या सामाजिक थरांपर्यंत पोहचलेलं आहे. याचा अपरिहार्य परिणाम म्हणून महाराष्ट्रातल्या विविध भागात ग्रामीण लेखक जन्माला येत आहेत. नव्या उमेदीनं, नव्या ताकदीने ते लिहित आहेत."[२२] बोराडेंच्या या विचारावरून ग्रामीण साहित्य चळवळीचे स्वरूप आपल्या लक्षात येते.

ग्रामीण साहित्य चळवळीला आता चांगला आकार आला आहे. २५ वर्षाच्या या चळवळीमधून ग्रामीण जीवनाचे विविध पैलू,समस्या चित्रीत झाल्या आहेत. कथा, कविता, कादंबरी आणि समीक्षा या स्वरूपात लेखन झाले आहे. ग्रामीण साहित्यिक स्वातंत्र्य, समता, बंधुता, मानवता इत्यादी मूल्यांचा स्वीकार करून ग्रामीण जीवनातील व्यथा, वेदनांचे प्रत्ययकारी चित्रण करताहेत हे या चळवळीचे फलित मानायला हरकत नाही.

ग्रामीण साहित्याच्या चळवळीनंतर एक मोठी लेखकांची पिढी आकाराला आली. त्यांनी साहित्याचे विविध प्रकारे हाताळले असले तरी ग्रामीण साहित्य खऱ्या अर्थाने कथा, कादंबरी, कविता आणि समीक्षा याच साहित्याच्या प्रांतात रेंगाळताना दिसून येते. ग्रामीण साहित्याची वाटचाल समजून घेताना वरील साहित्य प्रकारामध्ये ग्रामीण साहित्य कशापद्धतीने प्रकट होत जाते याचा आढावा घेऊ.

## ग्रामीण कथा, कविता, कादंबरीची वाटचाल :

### ❖ ग्रामीण कवितेची वाटचाल :

ग्रामीण कविता हा प्रकार इंग्रजीतील 'पॅस्टोरोल पोएट्री' वरून मराठीत आल्याचे दिसून येते. वर्डस्वर्थच्या 'सॉलिटरी रीपर' सारख्या कवितेवरून ग्रामीण कविंनी अनेक कविता लिहिल्या. तरीही ग्रामीण कवितेचा विचार करताना या संदर्भात विश्वास जहांगिरदार यांचे विवेचन विचारात घेणे उपयुक्त ठरेल. 'ग्रामीण कवितेमध्ये बाह्यवास्तव हे खेडे, निसर्ग आणि पारंपरिक मूल्ये यातून घडलेले ग्रामजीवन आहे. आणि त्यात आकाररूपाला आलेली संवेदनशीलता त्या जीवनातील अनुभवविषयीच्या प्रतिक्रिया देत असते.' त्यांचे हे विवेचन यथार्थ वाटते कारण ग्रामीण वास्तवाला केंद्रस्थानी ठेवणारी ही कविता स्वाभाविकपणेच वास्तवाभिमुख राहते.

१९२० नंतर सुरवातीची ग्रामीण कविता ही रविकिरण मंडळ काळात स्फुट आणि खंडकाव्याच्या स्वरूपात लिहिली. भा. रा. तांबे यांच्या 'गुराख्याचे गाणे', 'दुष्काळानंतर दुष्काळ' अशा कवितामधून जानपद कवितेच्या पाऊलखुणा शोधता येतात. तरीही त्या पूर्ण वाटत नाहीत. याउलट गिरीष, यशवंत, चंद्रशेखर यांनी जाणीवपूर्वक जानपद काव्यलेखन केले. गिरीशांची 'भलरी', यशवंतांची 'प्रेमाची दौलत' हे जानपद जीवनाचे सुरवातीचे आविष्कार आहेत. तरीही खऱ्या अर्थाने जानपद कवितेचे प्रतिनिधिक दर्शन ग.ल.ठोकळ संपादित 'सुगी' (१९३३) या कविता संग्रहात घडते. या कवितेचा विचार करता यशवंत व गिरीशादी कवी जानपद कवितेत प्रेमानुभवाच्या आविष्कारावर भर दिलेला दिसून येतो. प्रसंगी गिरीश, श्री. वा. रानडे, 'भलरी' 'लेझीम' यासारखी वेगळी कविताही लिहितात. 'शीळ' ना. ध. देशपांडे, 'कोळ्याचे गाणे' अनंत काणेकर, या कवितांमधून ग्रामीण जीवन पूर्णपणे प्रकट झाले असे म्हणता येते.

'सुगी' हे मात्र बहुतांशी ग्रामीण जीवन मांडताना शेती, पिके, निसर्ग, मोट, सुगी, पेरणी, काढणी, पाऊस, गुराखी इत्यादी विषयासंबंधीचे लेखन केले. सुगीनंतर एकच

वर्षांनी ग्रामीण वास्तव साकारणारी ग. ह. पाटलांची कविता 'रानजाई' या काव्यसंग्रहातून समोर आली. त्याचबरोबर ग. ल. ठोकळांची 'मीठभाकर' आणि के नारखेडे यांचा 'शिवार' हा काव्यसंग्रह प्रसिद्ध झाला. ग. ल. ठोकळाबद्दल आनंद यादव म्हणतात, 'ठोकळांची ग्रामीण कविता इतरांच्या तुलनेत अधिक सच्ची आहे. ग्रामीण कवितेला मराठी वाड्.मयात स्वतंत्रपणे प्रस्थापित करणारा व तिला प्रतिष्ठा प्राप्त करून देणारा पहिला ग्रामीण कवी त्याच्या मर्यादा लक्षात घेऊन मानावा लागतो.''[२३]

याच काळात १९५२ मध्ये अस्सल ग्रामीणत्त्वाशी नातं सांगणारी 'बहिणाबाईंची गाणी' समोर आली आणि ग्रामीण जीवनाचे अनुभवविश्व प्रकट झाले स्वातंत्रोत्तर काळातील ग्रामीण कवितांचा विचार करता आनंद यादव यांच्या ग्रामीण 'हिरवे जग' (१९६०) पासून सुरू करावा लागतो. हिरवे जग पाठोपाठ राजा महाजन 'डहाळी' (१९६०), सरोजीनी बाबर 'पाळणा' (१०६४) इत्यादी कवितासंग्रह प्रसिद्ध झाले. आणि साठोत्तरी ग्रामीण कविता प्रसिद्ध झाली.

या साठोत्तरी ग्रामीण कवितेच्या प्रवाहामध्ये पुढे पुरुषोत्तम पाटील, ना.धों.महानोर, विठ्ठल वाघ, एकनाथ देशमुख यांची कविता आपआपली स्वतंत्र अभिव्यक्ती घेऊन अवतरली. महानोरांच्या कविता (रानातल्या कविता १९६७) या अस्सल ग्रामीण वास्तवाचे गहिरे परिणाम घेऊन अवतरली. त्यानंतर विठ्ठल वाघ (सत्य), शंकर बडे (इरवा), गणेश कुडे (आभाळाचं दान १९८१) या कवितामधून ग्रामीण जीवनाचे उदात्तीकरण केले आहे. आनंद यादवांच्या 'हिरवे जग' नंतर आलेल्या 'मळ्याची माती' (१९७८) ने ग्रामीण जीवनाशी आपली नाळ जोडली आहे. म्हणूनच त्या कवितांबद्दल विश्वास जहागिरदार लिहतात, ''त्यांनी लिहलेली 'मळ्याची माती'मधील कविता हा मराठी साहित्यातील ग्रामीण संवेदनशीलतेच्या कविता या प्रकारातील आविष्कारामधला एक मैलाचा दगड आहे.''[२४] त्यांचे हे विधान समर्पक वाटते. इंद्रजीत भालेराव हे आजच्या ग्रामीण कवितेतील लक्षणीय नाव आहे. त्यांच्या 'पीकपाणी' (१९८९) या काव्य संग्रहामधून ग्रामीणतेचे अस्सल दर्शन होते.

अशाप्रकारे मराठी ग्रामीण कवितेत काळानुरूप बदल होत जावून ती अधिक अधिक वास्तवदर्शी व संवेदनशील बनण्याचे दिसून येते.

**ग्रामीण कथेची वाटचाल :**

मानवी संस्कृतीत कथा हा वाङ्.मय प्रकार फार प्राचीन आहे. अगदी महानुभाव संप्रदायापासून कथा सांगितली जाते. ग्रामीण साहित्यातही कथा हा वाङ्.मय प्रकार चांगलाच रूजल्याचे दिसते. तरीही ग्रामीण कथेचा आढावा घ्यावयाचा म्हटल्यास तो फारसा मोठा होईल असा नाही. असे असूनही ज्या ग्रामीण कथाकारांनी ग्रामीण कथा लिहल्या त्या मात्र ग्रामीण जीवनातील स्पंदनांचा वेध घेणाऱ्या ठरल्या. व्यंकटेश माडगूळकरांनी गावाकडच्या गोष्टी सांगायला सुरवात केली आणि खऱ्या अर्थाने मराठी ग्रामीण कथेला सुरवात झाली. तरीही सुरवातीपासून आतापर्यंत ग्रामीण कथाही आशयाच्या व अनुभवाच्या दृष्टीने अधिक संपन्न होत गेल्याचे दिसून येते.

महात्मा फुले यांच्या साहित्याचे महत्त्व लक्षात घेऊनही १८९७ च्या दुष्काळावरील हरीभाऊ आपटे यांची 'काळ तर मोठा कठीण आला' ही कथा ग्रामीण साहित्याचा प्रारंभ मानला जातो. १९२० नंतर भारतीय राजकारणातील स्थित्यंतरामुळे महाराष्ट्रात गांधीप्रणीत सामाजिक चळवळीच्या प्रेरणेने ग्रामजीवनाकडे लेखकांचे लक्ष गेले. सुखटणकर, सरदेसाई, दिघे यांच्या कथा प्रकाशित झाल्या. १९४९ साली प्रसिद्ध झालेला श्री. म. माटे यांचा 'उपेक्षितांचे अंतरंग' हा कथासंग्रह महत्त्वाचा मानला जातो. पण ग्रामीण कथेतून ग्रामीण साहित्य सिद्ध केले ते, व्यंकटेश माडगूळकर, म. भा. भोसले, शंकर पाटील, द. मा. मिरासदार, उद्धव शेळके, शंकरराव खरात, अण्णाभाऊ साठे, गो.नि.दांडेकर, मधू मंगेश कर्णिक, रा. रं. बोराडे, आनंद यादव, महादेव मोरे, चारूता सागर, आणि सखा कलाल या लेखकांनी. त्यानंतर ग्रामीण भागात उभारलेल्या महाविद्यालयामधून ग्रामीण कथाकारांची नवी पिढी उदयास आली. त्यांनी आपल्या लेखनाने अस्सल ग्रामीणत्वाचा वेध घेण्यास सुरवात केली. त्यामध्ये रंगराव बापू पाटील, डॉ.द.ता.भोसले, भास्कर चंदनशिव, डॉ.आनंद पाटील,

शंकर खंडू पाटील, वासुदेव मुलाटे, बा.ग. केसकर, गणेश आवटे, प्रतिमा इंगोले आणि अनंत भोगर हे लेखक होत.

मराठी ग्रामीण कथेबद्दल म. द. हातकंणगलेकर म्हणतात, ''१९४५ च्या सुमारास मौज–सत्यकथेमधून माडगूळकरांनी अभावितपणे ग्रामीण मराठी कथेचे मन्वंतर घडविले, या मन्वतंराच्या पताका मिरासदार, शंकर पाटील, आनंद यादव, शंकरराव खरात, रा. रं. बोराडे, सखा कलाल इत्यादी बिनीच्या ग्रामीण कथाकारांनी मिरविल्या.''[२५] अशाप्रकारे माडगूळकरांनी ग्रामीण कथेला सखोल ग्रामीण चिंतनाची जोड देऊन कथा भावस्पर्शी व ह्द्‌यस्पर्शी बनवली. त्यांच्या 'माणदेशी माणसांनी' ग्रामीण कथेचा १०० नंबरी अस्सलपणा दाखवला.

शंकर पाटलांनी माडगूळकरांच्या आगेमागेच कथा लेखनाला प्रारंभ केला. त्यांनी ग्रामजीवनातील दु:ख, दैन्य, बेरकीपणा, नादिष्ठपणा, रंग, ढंग, खट्याळपणा आपल्या कथांमधून रंजकपणे मांडला. त्यांच्या आभाळ, वेणा, 'बहार' या कथा लक्षात राहतात. या सर्व ग्रामीण कथाकारांची भाषाशैली जिवंत व रसरशीत होती. त्यामुळेच ग्रामीणत्वाचा अस्सल आविष्कार करणाऱ्या व ग्रामीण वास्तवाशी भिडू पाहणाऱ्या ह्या कथांबद्दल प्रा. नरहर कुरुंदकर म्हणतात, ''ग्रामीण कथांचा जिवंतपणा तिच्या बोलीवर निगडीत असतो.''[२६] हे अगदी यथार्थ वाटते.

१९६० नंतरच्या ग्रामीण कथेचे दोन ठळक टप्पे जाणवतात. एक आनंद यादव यांच्या कथेचा व दुसरा सखा कलाल यांच्या कथेचा आनंद यादवांनी आपल्या कथांमधून ग्रामीण जीवनाचा चिंतनात्मक विचार केला. त्यांच्या 'खळाळ' या कथासंग्रहातील 'मोट' व 'धुणे' या कायम स्मरणात राहणाऱ्या कथा आहेत. अशाप्रकारे त्यांची कथाही ग्रामीणत्वाचा वेध घेणारी होती. यानंतर सखा कलालांचे कथालेखन हे अत्यंत सौम्य, मंद, तरल व तलम असे आहे. त्यांच्या कथांमधून ग्रामीण दु:खाचे प्रत्ययकारी चित्रण आपल्याला दिसून येते. त्यांच्या कथांमधून दु:ख भोगणारी खेडूत माणसं आपल्याला भेटतात. त्यांचा 'ढग' हा कथासंग्रह या दृष्टीने अत्यंत समर्पक असाच आहे.

अशाप्रकारे ज्या वाड्.मयप्रकारातून मराठी ग्रामीण साहित्य अधिक सकसपणे व समर्थपणे व्यक्त झालेले आहे. तो साहित्यप्रकार म्हणजेच कथा होय. या कथेची वाटचाल वरीलप्रमाणे झाल्याचे आपणास दिसून येते.

## ग्रामीण कादंबरीची वाटचाल :

ग्रामीण साहित्याच्या वाटचालीमुळे कथेसारखेच कादंबरी विश्वही आकाराला आले आहे. ग्रामीण साहित्याच्या प्रवाहाची एक धारा ग्रामीण कादंबरीतून वाहते आहे. मराठी ग्रामीण कादंबरीच्या वाटचालीचा विचार करताना प्रथम महात्मा फुले यांच्या 'शेतकऱ्याचा आसूड' (१८८५) चा उल्लेख करावा लागेल. ग्रामीण जीवनाच्या चित्रणाला पहिला स्पर्श खऱ्या अर्थाने फुलेंनी केला. त्यांच्या या ग्रंथाबद्दल डॉ.रविंद्र ठाकूर म्हणतात, ''तो वाचताना आपण एखादी ग्रामीण कादंबरी वाचतो आहोत की काय असे वाटू लागते,'' ग्रामीण समाज जीवनाचा एक वाड्.मयीन दस्तऐवज हे कादंबरीचे प्रमुख वैशिष्ट्य यामध्ये आहे.

ग्रामीण कादंबरीत असणारे महत्त्वाचे घटक म्हणजे शेती, शेतकरी त्यांचे दारिद्र्यमय जीवन या घटकांचे अतिशय वास्तव चित्रण फुलेंनी केल्याचे दिसून येते. यानंतर कृष्णराव भालेराव यांची 'बळीबा पाटील' १८८८ ही कादंबरी कालानुक्रमे पहिली म्हणता येईल. कादंबरी ग्रामीण जीवन आकारणारी असली तरी मजकुराचा आशय कमी असल्याने पहिल्या कादंबरीचा मान धनुर्धारी यांच्या 'पिराजी पाटील' (१९०३) या कादंबरीकडे जातो. 'पिराजी पाटील' ही कादंबरी ग्रामीण वास्तवाशी एकरूप झाली आहे.

त्यानंतर १९२५-३० च्या दरम्यान ना.वि.कुलकर्णी यांनी आपल्या मजूर (१९२५) कसे दिवस जातील (१९२५), पैसा (१९२६) या कादंबऱ्यांमधून ग्रामीण जीवन साकारले. त्यांच्या लेखनातूनच पुढे दिघे, शिरूरकर, पेंडसे अशा लेखकांना प्रेरणा तसेच नवी दिशा मिळाली. १९२० पासून गांधी युग सुरू झाल्यापासून त्याचा ग्रामीण कादंबरीलेखनावर ही परिणाम झाला. त्यामधून वा.म.जोशी, खांडेकर, वरेरकर, यांच्या

कादंबऱ्या साकारल्या. त्यांनतर आलेली 'श्यामची आई' (१९३५) ही कांदबरी भावस्पर्शी वाटते. त्याचबरोबर रा. रा. वाळिंबे यांच्या 'मोहित्यांची मंजुळा', 'खरा उद्धार' तसेच वि. वा. हडपांच्या 'झाकली मुठ' सारख्या कादंबऱ्यामधून ग्रामीण चित्रण झाल्याचे जाणवते.

र.वा.दिघे यांनी आपल्या पानकळा (१९३९), सराई (१९४३) या कांदबऱ्यातून ग्रामीण जीवन उभे केले. यांच्या प्रेरणेच ग.ल. ठोकळांची 'गावगुंड' सारखी कादंबरी साकारली. त्यानंतर १९४३ मध्ये मर्ढेकरांनी 'तांबडी माती' ह्या कादंबरीमधून ग्रामीण जीवन रेखाटले. याच पद्धतीने याच काळात अनेक ग्रामीण कादंबरीकारांनी आपल्या लेखनीतून ग्रामीण कादंबरीला नवा आशय दिला.

त्यानंतरच्या काळात मात्र विभावरी शिरूरकरांची 'बळी' (१९५०) बोरकरांची 'भाविण' (१९५०), श्री. ना. पेंडसेंच्या 'गारंबीचा बापू' (१९५२) हत्या (१९५४), रथचक्र (१९६२), गो.नि. दांडेकरांच्या 'पड्घवली', 'पवनाकाठचा धोंडी', 'शितू', 'पूर्णामायची लेकरे' इत्यादी कादंबऱ्यांमधून ग्रामीण तसेच प्रादेशिक जीवन वास्तव पातळीवरून साकारल्याचे आपणास दिसून येते.

बिनीच्या कथाकारांमधील व्यंकटेश माडगूळकर यांनी 'बनगरवाडी' (१९५५) ही कादंबरी लिहून संपूर्ण गावगाडाच उभा केला. त्याचबरोबर १९६२ ला उद्धव शेळके यांची 'धग' ही कादंबरी ग्रामीण कादंबरीत मैलाचा दगड ठरली. ग्रामीण वास्तवाला भिडणारे असे लेखन त्यांनी केले. त्यानंतर रणजित देसाई यांच्या 'बारी'(१९५९), माझा गाव (१९६०) या कादंबऱ्यांमध्येही ग्रामीणता आली आहे.

साठोत्तरी ग्रामीण कादंबरी मात्र फारच बहरलेली दिसते. शंकर पाटील यांची 'टारफुला', हमीद दलवाई यांची 'इंधन' (१९६५), जयवंत दळवींची 'महानंदा', चि.त्र्यं. खानोलकरांची 'रात्र काळी घागर काळी' या कादंबऱ्या ग्रामीण साहित्याला एक नवी दिशा देणाऱ्या ठरल्या.

ग्रामीण कादंबरीत मोलाची भर टाकणाऱ्या आनंद यादव व रा. रं. बोराडे यांच्या कांदबऱ्यांनी मराठी कादंबरीत आपले वैशिष्ट्यपूर्ण असे स्थान निर्माण केले आहे. यादवांची

'गोतावळा' (१९७१) व बोराडेंची 'पाचोळा' (१९७१) या कादंबऱ्या ग्रामीण कादंबरीमध्ये मैलाचा दगड ठरलेल्या आहेत.

अशाप्रकारे मराठी ग्रामीण कादंबरीही खऱ्या अर्थाने १९६० नंतर बहरल्याचे आपणास दिसून येते. वरीलप्रमाणे कथा, कादंबरी, कविता या क्षेत्रांचा आढावा घेतल्यास आपल्या ग्रामीण साहित्याच्या वाटचालीची कल्पना येईल. या साहित्य प्रकारांबरोबरच अलिकडच्या काळात ग्रामीण साहित्यामध्ये ललितलेखन, चरित्र, निबंधलेखन व समीक्षा या घटकांवर लेखन झाल्याचे आपणास दिसून येते. पण त्यामध्ये म्हणावे इतके किंवा नजरेत भरण्यासारखे लेखन आपणास समीक्षा सोडली तर दिसून येत नाही.

## साहित्यावरील आरोप :

जीवनातल्या चळवळींचा बरा-वाईट, प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष परिणाम हा सांस्कृतिक जीवनावर होतच असतो. त्याचाच परिणाम साहित्यावरही होत असतो. अशा परिणामातूनच ग्रामीण साहित्याची चळवळ आकाराला येऊ पाहते आहे. गेल्या पंधरा-वीस वर्षात या चळवळींने मूळ धरले आहे. असे असतांनाही या चळवळीवर काही आरोप केले जातात. ते म्हणजे ग्रामीण साहित्याची चळवळ ही दलित साहित्याच्या चळवळीचे अनुकरण करते. जरी दलित साहित्याची चळवळ ग्रामीण साहित्याच्या आधी सुरू झाली असली तरी असा आरोप करणे चुकीचे ठरेल. कारण जीवनातील प्रश्नातून चळवळी जन्म घेत असतात. आणि अशाच पद्धतीने ग्रामीण जीवनातील प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी, ग्रामीण वास्तव साकारण्यासाठी ग्रामीण साहित्याची चळवळ उदयास आली. त्यामुळे असे म्हणणे योग्य ठरणार नाही.

तसेच दलित साहित्याला 'शह' देण्यासाठी ग्रामीण साहित्याची चळवळ सुरू झाली असे म्हणणेही चुकीचे ठरेल. कारण जीवन संघर्षाचे, परिवर्तनाचे संदर्भ असल्याशिवाय वाङ्.मयीन चळवळ उभी राहू शकत नाही. केवळ अनुकरणातून किंवा शह देण्याच्या हेतूमधून कोणत्याही वाङ्.मयीन चळवळी उभ्या राहू शकत नाहीत. आणि राहिल्या तर टिकू

शकत नाहीत. कारण चळवळीला एक परंपरा असते. जी आज दलित व ग्रामीण दोन्ही चळवळींना आहे फार तर या दोन्ही चळवळी एकाच उद्देशाने निघाल्या असे म्हणता येईल. कारण या दोन्ही चळवळी थोड्याबहुत फरकाने न्याय, समता, बंधूता, जातीयता, वर्णव्यवस्था, आर्थिक विषमता या आधारावर उभारलेल्या आहेत. त्यामुळे असे आरोप करणे चुकीचे ठरते.

## ग्रामीण साहित्याच्या मर्यादा :

ग्रामीण साहित्याने गेल्या वीस वर्षाच्या कालखंडात साहित्याच्या वेगवेगळ्या प्रांतात आपला यशस्वी ठसा उमटवला असला तरी ग्रामीण साहित्याला काही मर्यादा असल्याचे आपल्याला दिसून येते. ग्रामीण साहित्य हे कथा, कविता, कादंबरी यामधून आकाराला आले असले तरी खऱ्या अर्थाने कथा या साहित्य प्रकारातच ग्रामीण साहित्य फिरत असल्याचे दिसून येते. कथेच्या प्रांतानेच ग्रामीण साहित्य व्यापून टाकले आहे. त्यामानाने कविता व कादंबरी ग्रामीण साहित्यात दिसून येत नाही.

दलित साहित्याच्या तुलनेत समाजव्यवस्थेच्या विरूद्ध बंड करून उठण्याची प्रखर जाणीव ग्रामीण साहित्यात कमीच आहे. याला मग अनेक कारणे असतील त्यामध्ये सर्व दूर पसरलेला समाज,त्यांचे अनेक प्रश्न, ग्रामीणांचे असंघटीत असणे इत्यादी या कारणांचा शोध ग्रामीण साहित्यिकांनी घ्यावयास हवा. असे असले तरी एकूण व्यवस्था उद्‌ध्वस्त करण्याची आणि नवी समताधिष्ठित समाजरचना उभारण्याची जाणीव ग्रामीण साहित्यात कमी प्रमाणात आहे. हे ही तितकेच खरे आहे.

याचबरोबर एकूणच आधुनिक मराठी साहित्याप्रमाणे ग्रामीण साहित्य अजूनही मध्यमवर्गीय संवेदनशीलतेपासून संपूर्णत: मुक्त होत नाही. जोपर्यंत ग्रामीण साहित्य तळागाळातील गोरगरीब सर्वसामान्य जनतेच्या संवेदनेशी आपली नाळ जोडणार नाही, तोपर्यंत ग्रामीण साहित्याची चळवळ सदृढ होणार नाही. १९२५ पासून ग्रामीण साहित्याची निर्मिती होत असूनही, ग्रामीण साहित्याचा व्हावा तसा विकास झाला नाही. याला कारणही

हेच आहे की, आजही ग्रामीण लेखकांच्या जीवनानुभवांचे विश्वही फार मोठे नाही, फार व्यापक नाही. आजही ग्रामीण साहित्य शेतकरी कुटुंबाभोवती फिरताना दिसते.

आजही काही अपवाद वगळता ग्रामीण भागातील शेतमजुरांचे, तीव्र दारिद्र्याचे चित्रण मराठी साहित्यात येताना दिसत नाही. ते मध्यमवर्गीयांभोवती घोटाळताना दिसते. दलित साहित्याप्रमाणे प्रचंड दारिद्र्याविरूद्ध, अन्यायाविरूद्ध ग्रामीण साहित्यात नकाराची, विद्रोहाची जाणीव येताना दिसत नाही. ग्रामीण समाजातील भयंकर राजकारण, घराणेशाही यातून होणारी सर्व सामान्य मजूरांची व गोरगरीब शेतकऱ्यांची दयनीय अवस्था याविरूद्ध बंड करून आवाज उठवताना ग्रामीण साहित्य आपल्याला दिसत नाही. आजही वास्तवाला सामोरे जाणारे लेखन ग्रामीण वाड्.मयात व्हावे तितके झालेले नाही असेच म्हणावे लागेल.

ग्रामीण कविता, कादंबरी ही मोठ्या प्रमाणात लिहली जात नाही. ग्रामीण लेखकांची सारी मदार केवळ कथालेखनावर आहे. शंकर पाटील, व्यंकटेश माडगुळकर, आनंद यादव इत्यादी लेखकांनी इतर प्रांतात लेखन केले असले तरी तेही हाताच्या बोटावर मोजण्याइतकेच. अशाप्रकारे आशयाच्या, प्रयोगशीलतेच्या आणि वाड्.मय प्रकारांच्या दृष्टीनेही आजच्या ग्रामीण साहित्याला मर्यादा असल्याचे आपल्याला दिसून येते.

**ग्रामीण साहित्याचे भवितव्य:**

येणाऱ्या भविष्यकाळात ग्रामीण जीवनात झपाट्याने बदल होत आहे. यंत्रयुगातील विविध सोयी खेड्यापाड्यांवर पोहचत आहेत. शिक्षणाचे प्रमाण वाढून शिक्षणाची ज्ञानगंगा घरोघरी पोहोचते आहे. पूर्वीचे बरेचसे प्रश्न आता इतिहास जमा झाले आहेत व नवे प्रश्न आ वासून समोर उभे आहेत. ग्रामीण माणसामध्ये आणि त्याच्या सजगतेमध्येही आता खूप बदल झाला आहे. ह्या सर्व बाबींचा परिणाम ग्रामीण साहित्यावर होणे अपरिहार्य आहे.

या आधुनिकीकरणामुळे काही ठिकाणी असा सूर निघतो की, खेडे आणि शहरे यामध्ये आता अंतर कुठे आहे. हे असे असले तरी खेडे हे खेडेच आणि शहर हे शहरच राहणार आहे. कारण कितीही आधुनिकीकरण आले तरी खेड्याचा आत्मा असणारी शेती

कधीही नष्ट होऊ शकत नाही. फार तर ती कसण्याच्या पद्धतीत बदल होतील. कारण खेड्याचे जर कोणते प्रमुख लक्षण असेल तर ते म्हणजे कृषिकेंद्रीतता. खेड्यामधून शेती वजा केली तर खेडे खेडे उरणार नाही.

असे असले तरी पूर्वीच्या काळची खेडेगावातील किंवा ग्रामीण भागातील सामुहिक जीवनपद्धती किंवा परस्परांना समजून घेऊन वागणे, एकमेकांच्या दु:खात सहभागी होणे. ह्या साऱ्या गोष्टींना राजकारणामुळे व जातीयवादी पक्षांमुळे कीड लागायला सुरवात झाली आहे. अशा परिस्थितीमुळे गाव-गावकी, भाव-भावकी च्या राजकारणात काही वर्षांनी प्रत्येक खेडे धगधगते कुंडच होणार आहे. ही ग्रामीण भागाची धग ग्रामीण लेखक कशी समजून घेतो व ती साहित्यात कशापद्धतीने मांडतो हा महत्त्वाचा प्रश्न आहे. हेच उद्याचे वास्तव ग्रामीण लेखकांपुढील मोठे आव्हान असणार आहे.

ज्यावेळी बदलत्या वास्तव जीवनाचे, ग्रामीण जीवनासमोरील आव्हानांचे, ग्रामीण माणसाच्या आधुनिक विचारसरणीतून निर्माण झालेल्या संवेदनशीलतेचे खरे रूप ग्रामीण साहित्यिक जेव्हा जिवंतपणे शब्दबद्ध करतील तेव्हाच उद्याचे ग्रामीण साहित्य अधिक समृद्ध होईल आणि कदाचित उद्याचे ग्रामीण साहित्य हेच मराठी साहित्याची मुख्य धारा होईल! हाच आशावाद.

**निष्कर्ष :**

१) स्वांतत्र्योत्तर काळात निर्माण झालेल्या वाड्.मयीन चळवळीमध्ये ग्रामीण साहित्याची चळवळ ही एक महत्त्वाची साहित्यिक चळवळ आहे.

२) साहित्याची नेमकी लक्षणे सांगताना पौर्वात्य व पाश्चात्य साहित्यशास्त्रज्ञांनी आपली मते व्यक्त केली आहेत.

३) साहित्यावर जीवनाचा पर्यायाने समाजजीवनाचा परिणाम होत असतो व त्यातून साहित्याची निर्मिती होत असते.

४) जीवनातील वास्तव प्रश्नातून साहित्यिक चळवळी जन्म घेत असता उदा. ग्रामीण व दलित साहित्याची चळवळ.

५) ग्रामीण साहित्याच्या चळवळीचे मुळ हे ग्रामीण जीवनाचे दु:ख, व्यथा, वेदना, रूढी, परंपरा, अंधश्रद्धा हेच आहे.

६) शेतकऱ्याचा आसूड, ब्राह्मणांचे कसब, गुलामगिरी इ. ग्रंथ लिहून शेतकऱ्यांना विज्ञाननिष्ठ दृष्टी देणारे म. फुले हे ग्रामीण साहित्याचे प्रेरणा स्थान आहे.

७) ग्रामीण जीवनातून फुलणारे व ग्रामीण वास्तवातून साकार होणारे हेच ग्रामीण साहित्याचे स्वरूप आहे.

८) ग्रामीण जीवनाचा कृषिकेंद्रीतता व निसर्गधिनता हाच आत्मा आहे.

९) आधुनिकीकरणाचा व औद्योगिकरणाचा कितीही परिणाम झाला तरी ग्रामीण आणि नागर हा भेद राहणारच आहे.

१०) महात्मा फुल्याबरोबर राजर्षी शाहू महाराज, सयाजीराव गायकवाड, डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारसरणीतून ग्रामीण साहित्य जन्म घेताना दिसते.

११) म.गांधी यांनी १९२० च्या दरम्यान दिलेली 'खेड्याकडे चला' ही हाक ही ग्रामीण साहित्यावर व एकूणच ग्रामीण जीवनावर परिणाम करून गेली.

१२) ग्रामीण साहित्यिकांमध्ये आनंद यादव, श्री. म. माटे, रा रं. बोराडे, व्यंकटेश माडगूळकर, ना. धों. महानोर, उद्धव शेळके, हमीद दलवाई, सदानंद देशमुख, इंद्रजीत भालेराव, शंकर पाटील इ. प्रतिभासंपन्न साहित्यिक आहेत.

१३) ग्रामीण साहित्य हे कथा, कविता व कादंबरी या साहित्यप्रकारामध्ये फुलताना आपल्याला दिसून येते.

१४) ग्रामीण साहित्यावर काही आरोप होताना दिसून येतात. त्याचबरोबर त्याच्या काही मर्यादाही स्पष्ट होतात.

१५) ग्रामीण जीवनात होणाऱ्या बदलामुळे आज ग्रामीण समाजासमोर नवी आव्हाने, नवे प्रश्न उभे राहिले आहेत. आणि यावरच ग्रामीण साहित्याचे उदयाचे भवितव्य अवलंबून असणार आहे.

**सारांश :**

ग्रामीण साहित्याचे स्वरूप व वाटचाल पाहत असताना सुरवातील साहित्य म्हणजे काय? हे सांगताना पौर्वात्य व पाश्चात्य साहित्यशास्त्रज्ञांनी मांडलेल्या साहित्य लक्षणांची चर्चा केली व साहित्याचा नेमका अर्थ स्पष्ट केला. तद्नंतर साहित्य हे समाजाचे अपत्य असते या विचारानुसार समाजजीवनातून साहित्य कशाप्रकारे निर्माण होते याचा आढावा घेतला. त्यानंतर कालानुक्रमे समाजात होणाऱ्या सांस्कृतिक चळवळीतून वाड्.मयातही कशाप्रकारच्या चळवळी निर्माण होतात; ह्याचा महानुभाव संप्रदायाच्या साहित्यापासून ते आजच्या दलित व ग्रामीण साहित्याच्या चळवळीपर्यंत विवेचन केले.

यानंतर ग्रामीण म्हणजे नेमके काय? हे समजून घेऊन ग्रामसंस्कृतीचे स्वरूप उलघडून, स्पष्ट करून सांगितले. हे सांगत असताना ग्रामीण भागातील शेती, शेतकरी, त्यांचे प्रश्न, श्रद्धा, अंधश्रद्धा, त्यांची संवेदनशीलता व जगण्याची रीत, कृषिनिष्ठ समाजव्यवस्था ह्या गोष्टींचा परामर्श घेतला. तद्नंतर ग्रामीण आणि नागर यामधील नेमका भेद स्पष्ट करून ग्रामीण म्हणजे काय हे स्पष्ट करून सांगितले. त्यानंतर ग्रामीणसाहित्य म्हणजे काय? हे विविध अभ्यासकांच्या मतांची नोंद घेवून स्पष्ट केले व ग्रामीण साहित्याची संकल्पना यथार्थपणे मांडली. त्यानंतर निर्माण होणाऱ्या ग्रामीण साहित्याची निर्मिती कशाप्रकारे झाली व त्या साहित्याच्या नेमक्या प्रेरणा कोणत्या हे पाहिले. हे पाहत असताना म.फुल्यांच्या 'शेतकऱ्याचा आसूडापासुन ते शेतकऱ्याच्या आजच्या वास्तव परिस्थितीचा व ज्वलंत प्रश्नांचा आढावा घेतला. यातून निर्माण झालेली ग्रामीण साहित्याची चळवळ सटीप स्पष्ट करून सांगितली.

ग्रामीण साहित्याच्या वाटचालीचा अभ्यास करताना ग्रामीण कथा, कविता व कादंबरीची वाटचाल कशाप्रकारे चालू आहे याचा उहापोह केला. तद्नंतर ग्रामीण साहित्यावरील होणारे आरोप मांडून त्यांची कारणमीमांसा केली. आणि त्याचबरोबर ग्रामीण साहित्याच्या मर्यादाही स्पष्ट केल्या. तद्नंतर ग्रामीण साहित्याचे भवितव्य सांगून भविष्यकाळातील ग्रामीण लेखकांची जबाबदारी याची चर्चा केली.

## संदर्भ साहित्य :


१) डॉ. स. रा. गाडगीळ, विजया प्रकाशन, नांदेड, पृ.४.

२) डॉ. स. रा. गाडगीळ, विजया प्रकाशन, नांदेड, पृ.२३.

३) डॉ. विद्या व्यवहारे : 'साहित्यविमर्श', चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, पृ.२.

४) वा. ल. कुलकर्णी : 'साहित्य स्वरूप आणि समीक्षा'.

५) शिंदे विठ्ठल रामजी : 'शिंदे लेखसंग्रह' संपा. मुंगडकर, पृ.१७८.

६) आनंद यादव : 'ग्रामीण साहित्य स्वरूप आणि समीक्षा', प्रस्तावना : गो.म.कुलकर्णी.

७) निवडक शंकर पाटील प्रस्तावना.

८) अत्रे त्रिं. ना., 'गावगाडा', पृ. १-२.

९) ना. धों. महानोर, 'रानातल्या कविता'.

१०)ना. धों. महानोर, 'रानातल्या कविता'.

११)कुलकर्णी गो. म., 'मराठी ग्रामीण साहित्य: परिसर आणि प्रवाह', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, पृ.१९.

१२)यादव आनंद, 'ग्रामीण साहित्य स्वरूप आणि समीक्षा', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, पृ.१.

१३)कोत्तापल्ले नागनाथ, 'ग्रामीण साहित्य स्वरूप आणि शोध', पृ.७.

१४)यादव आनंद, 'ग्रामीण स्वरूप आणि समीक्षा', पृ.६७.

१५)भोसले एस.एस., संपा. राजर्षी शाहू काळ, 'विचार आणि कार्य', जि.प.कोल्हापूर, प्रथमावृत्ती, पृ.२२९.

१६)घटना : ग्रामीण परिषद – उद्देश क्र ६.

१७)यादव आनंद, 'ग्रामीण साहित्य स्वरूप आणि समीक्षा', पृ.११.

१८)यादव आनंद, 'ग्रामीण साहित्य स्वरूप आणि समीक्षा', पृ.६७.

१९)डॉ. विद्या व्यवहारे : 'साहित्यविमर्श', चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, पृ.८३.

२०)यादव आनंद, 'मराठी साहित्य समाज आणि संस्कृती', पृ.७८.

२१)डॉ. विद्या व्यवहारे : 'साहित्यविमर्श', पृ.८३.

२२)बोराडे रा. रं., 'ग्रामीण साहित्य', पृ. ९५-९६.

२३)यादव आनंद, 'ग्रामीण साहित्य स्वरूप आणि समीक्षा', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, पृ.४९.

२४)जहागिरदार विश्वास - म.सा.प. पत्रिका, 'ग्रामीण साहित्य विशेषांक', जुलै-डिसेंबर १९८०, पृ.१०१.

२५)हातकणंगलेकर म.द. - सा.प. पत्रिका, 'ग्रामीण साहित्य विशेषांक', पृ.५१.

२६)प्रा. नरहर कुरुंदकर - 'वानवळा', प्रस्तावना - पृ.१६.